F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६/४८७
ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**रजिस्टर्ड एडी /ई-मेलद्वारे**

क्रमांक : १८/तंशिसं/वि. का. पत्र/२०२०-२१/१८५
दिनांक : १४/०६/२०२१

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह योजनेंतर्गत वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८.०० लाख करण्याबाबत....**

संदर्भ : अल्पसंख्यांक विकास विभाग शासन निर्णय क्र. : अविवि-२०२०/प्र.क्र. ४३/प्र.क्र.४३/का-८, दि.२८/०५/२०२१.

**महोदय,**

उपरोक्त विषयासंबंधी शासनाकडून वरील संदर्भीय शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार आपल्या स्तरावर कार्यवाही करावी व सदर शासन निर्णयाची आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांना कळवून अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहामध्ये राहाणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती करुन द्यावी व त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यातबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. सदर शासन निर्णयाची **प्रत** या कार्यालयाने आपणांस खालील विभागवार ई-मेल पत्त्यावर पाठविलेली आहे.

१) romumbai@dtemaharashtra.gov.in
२) ropune@dtemaharashtra.gov.in
३) ronashik@dtemaharashtra.gov.in
४) roaurangabad@dtemaharashtra.gov.in
५) roamravati@dtemaharashtra.gov.in
६) ronagpur@dtemaharashtra.gov.in

14.06.21

( डॉ. धनपाल कांबळे )
उपसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

(5)

उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह योजनेंतर्गत वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८.०० लाख करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : अविवि-२०२०/प्र.क्र.४३/का-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ मे, २०२१.

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. शा. १५८०
दिनांक ११/६/२०२१
कार्यासन क्र. १८

पत्र प्राप्त झाले
10 JUN 2021
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

वाचा : १. अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अविवि २००९/प्र.क्र.१५/का-८, दिनांक ०२/०३/२०१०
२. अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : वसगृ २०१२/प्र.क्र.१६८/का-८, दिनांक २१/०६/२०१३.
३. अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : वसगृ २०१२/प्र.क्र.१६८/का-८, दिनांक ०५/०९/२०१४.

प्रस्तावना :

राज्य शासनाने अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख, पारसी व ज्यू या अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याकरीता वसतिगृह योजना संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. सदर योजनेनुसार वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी प्रवेशितांच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा विहीत करण्यात आलेली नाही. तथापि वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२,५०,०००/- पेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचे (खोलीभाडे, पाणी, वीज, वैद्यकीय सेवा) शुल्क पूर्णपणे माफ आहे. सदर वसतिगृह योजनेचा लाभ अल्पसंख्याक समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, याकरीता वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटूंबांची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.८.०० लाख करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

अल्पसंख्याक समाजातील (मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख, पारसी व ज्यू) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठीच्या वसतिगृह योजनेअंतर्गत वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न रु.२,५०,०००/- पेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचे (खोलीभाडे, पाणी, वीज, वैद्यकीय सेवा) शुल्क पूर्णपणे माफ असते. सदर वसतिगृह योजनेचा लाभ अल्पसंख्याक समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, याकरीता वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटूंबांची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.८.०० लाख करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. या योजनेच्या उर्वरीत सर्व अटी व शर्ती संदर्भ क्र.२ येथील दिनांक २१.०६.२०१३ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार पूर्वीप्रमाणेच लागू राहतील.

३. सदरचा निर्णय हा आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

Dandekar
Letter to RO
11/06/2021

४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
८. संचालक (प्रशिक्षण ) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई
९. जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी (सर्व)
१०. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
११. वित्त विभाग,(अर्थसंकल्प-१४), (व्यय-४ ) मंत्रालय, मुंबई
१२. नियोजन विभाग, (कार्या.१४७५).
१३. रोख शाखा व कार्यासन- ७, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती, का-.८

अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्याकरिता
बांधण्यात येत असलेल्या वसतीगृहांच्या
व्यवस्थापनाबाबत

# महाराष्ट्र शासन

## अल्पसंख्याक विभाग

## शासन निर्णय क्रमांकः वसगृ-२०१२/प्र.क्र. १६८/का. ८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई - ३२.

तारीख: २१ जून, २०१३.

वाचा —

१) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२००९/ प्र.क्र.१५/ का.८, दिनांक : ०२.०३.२०१०.

२) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्याक विकास विभाग क्र. वसगृ-२०११/प्र.क्र.१३०/का.८, दिनांक: २०.१२.२०११.

३) शासन निर्णय क्रमांकः वित्त विभाग क्र. पदनि २०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दिनांक-०२.०२.२०१३

प्रस्तावना :

अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींसाठी राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये वसतीगृहे बांधण्याबाबत शासन निर्णय दिनांक २ मार्च, २०१० रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

तसेच शासन निर्णय, दिनांक २० डिसेंबर, २०११ अन्वये विद्यापीठाच्या आवारात अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतीगृह बांधणे व ती चालविण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्या ठिकाणी विद्यापीठामार्फत संबंधित वसतीगृहाचे व्यवस्थापन पाहीले जाणार आहे.

दिनांक २.३.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे शासकीय किंवा विद्यापीठाच्या जमिनीवर वसतीगृह बांधून नामांकित अल्पसंख्याक अशासकीय संस्थांना, नसल्यास इतर अशासकीय संस्थाना व इतर शासकीय संस्थांना शासनाकडून / विद्यापीठाकडून ५ वर्षाकरिता करार करून चालविण्यास देण्यात येईल व संबंधित संस्थेचे काम समाधानकारक आढळल्यास वेळोवेळी कराराचे नुतनीकरण करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे. तथापि, मुलींची सुरक्षितता व वसतीगृह चालविण्यात येणाऱ्या संभाव्य अडचणी विचारात घेवून वसतीगृहांचे व्यवस्थापन जवळपास असलेल्या शासकीय महाविद्यालये / तंत्रनिकेतन / औद्योगिक प्रशिक्षण संस्था इ. मार्फत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी विद्यापीठाच्या आवारात बांधण्यात येत असलेली वसतीगृहे वगळून अन्य वसतीगृहांच्या व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यास शासन मान्यता देत आहे:-

**वसतीगृहाचे व्यवस्थापन :-** विद्यापीठांच्या तसेच शासकीय महाविद्यालये / तंत्रनिकेतने /औद्योगिक प्रशिक्षण संस्था इ. शासकीय शैक्षणिक संस्थांच्या आवारात बांधण्यात येत / येणार असलेली वसतीगृहे त्याच विद्यापीठांमार्फत / शासकीय शैक्षणिक संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. अशा वसतीगृहात , ते चालविण्याऱ्या शैक्षणिक संस्थेव्यतिरिक्त अन्य शैक्षणिक संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यीनींनादेखिल प्रवेश अनुज्ञेय असेल. वसतीगृहांमधील प्रवेश व आरक्षण शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१० मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. तसेच त्याव्यतिरिक्त इतर जागेत बांधण्यात येत असलेली वसतीगृहे जवळपासच्या शासकीय महाविद्यालये / तंत्रनिकेतन / औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विद्यापीठ इ. शासकीय शैक्षणिक संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. वसतीगृहाच्या आसपास कोणतीही शासकीय शैक्षणिक संस्था नसल्यास फक्त अशी वसतीगृहे अल्पसंख्याक विकास विभागामार्फत जिल्हाधिकारी यांचेकडून चालविण्यात यावीत. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा महिला व बाल

कल्याण अधिकारी, अन्य संबंधित महसूल अधिकारी व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचाही समावेश करण्यात यावा.

कर्मचारी वर्ग :-प्रत्येक वसतीगृहासाठी कंत्राटी पध्दतीने मानधनावर खालीलप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात यावा :-

| अ.क्र. | पदनाम | संख्या | मासिक मानधन रूपये | एकूण वार्षिक मानधन रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | अधिक्षक | १ | १५,००० | १८०००० |
| २ | लिपिक | १ | ८,००० | ९६००० |
| ३ | शिपाई | १ | ६५०० | ७८००० |
| ४ | सफाई कामगार | २ | ६००० प्रत्येकी | १४४००० |
| ५ | वॉचमन | ४ | ९००० प्रत्येकी | ४३२००० |
| | | ९ | एकूण | ९३०००० |

सदर कर्मचारी वर्ग संबंधित शासकीय शैक्षणिक संस्थेमार्फत अथवा संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून उपरोक्त मानधनाच्या मर्यादेत कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात यावा. सदर कर्मचारी वर्ग कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती निर्णय घेईल. अशी नियुक्ती करतांना बाह्य यंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कामे करुन घेण्याबाबत वित्त विभागाचे परिपत्रक दि.२ फेब्रुवारी, २०१३ यामधील मार्गदर्शक सूचनांनूसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी. प्रत्येक वसतीगृहासाठी शासकीय महाविद्यालय / तंत्रनिकेतन / औद्योगिक प्रशिक्षण संस्था इ. मध्ये कार्यरत असलेल्या महिला प्राध्यापक / सह प्राध्यापक इ. मधून एकाची रेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात यावी. रेक्टरने / अधिक्षकाने वसतीगृहामध्ये कायमस्वरूपी वास्तव्य करणे अनिवार्य राहील.

वसतीगृहात रहाणा-या मुलींमधून "कमवा व शिका" या तत्वावर लिपिक पदाच्या कामासाठी मुलींची निवड करण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल याप्रमाणे काम करण्यास मुली इच्छुक नसतील तर हे पद कंत्राटी पद्धतीने भरण्यात येईल.

**वसतीगृहातील प्रवेश** :- वसतीगृहामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना दि. २.३.२०१० च्या शासन निर्णयातील तरतूदींप्रमाणे ७०% जागा अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी राखीव असतील तर उर्वरित ३०% जागा बिगर अल्पसंख्याक समाजातील मुलींमधुन शासनाच्या प्रचलित आरक्षणानुसार भरण्यात येतील. अल्पसंख्याक समाजातील मुलींचे अर्ज पुरेशा प्रमाणात प्राप्त झाले नसल्यास इतर प्रवर्गातील मुलींना प्रवेश देता येईल. त्यासाठी इच्छूक मुलींकडून त्यांच्या महाविद्यालयांमार्फत अर्ज घेण्यात यावेत. प्रवेशासाठी गुणानुसार प्रवेश देण्यात यावेत. प्रवेशाबाबतचा निर्णय यथास्थिती संबंधित संस्थेचे प्राचार्य / जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने घ्यावा. पात्र विद्यार्थ्यींनी प्रवेशापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता समितीने घ्यावी.

शुल्क आकारणी :- वसतीगृहात प्रवेश घेणा-या मुलींसाठी सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे प्रत्येक सत्रासाठी शुल्क आकारणी करण्यात यावी.

प्रत्येक सत्राचे दर

(पहिले सत्र १० जून ते ३० नोव्हेंबर) (दुसरे सत्र १ डिसेंबर ते ३० एप्रिल)

| अ.क्र. | बाब | दर रुपये |
|---|---|---|
| १ | खोली भाडे | १७५०/- |
| २ | वीजशुल्क | १०५०/- |
| ३ | पाणी शुल्क | ५००/- |
| ४ | विद्यार्थी कल्याण निधी | ३००/- |
| ५ | वैद्यकीय सेवा शुल्क | ५०/- |
| ६ | Caution Money (नवीन प्रवेशासाठी( | ५००/- |
| एकूण | | ४१५०/- |

अल्पसंख्यांक समाजातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २,५०,०००/- पेक्षा कमी आहे अशा मुलींसाठी शुल्क पूर्णपणे माफ असेल व अशा विद्यार्थीनींना प्रवेशाकरिता प्राधान्य देण्यात येईल. या

विद्यार्थीनीकडून भारत सरकार / राज्य शासन यांच्या पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती / उच्च शिक्षणासाठी असलेली शिष्यवृत्ती, इ. सह सर्व शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अर्ज दाखल करुन घेणे व याबाबतची सर्व कार्यवाही पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी अधिक्षक यांची राहील.

वसतीगृहात प्रवेश घेणाऱ्या मुलींकडून प्राप्त होणारे शुल्क, वसतीगृहांच्या देखभालीकरिता या वसतीगृहांना प्राप्त होणारे अनुदान रु. २.०० लाख इतका निधी वसतीगृह चालविणाऱ्या शासकीय संस्थेंचे प्राचार्य यांचे नावे स्वतंत्र खाते काढून राष्ट्रीयकृत बँकेमध्ये ठेवण्यात यावे. मुलींकडून प्राप्त होणाऱ्या शुल्कामधून वसतीगृहाचा आकस्मिक खर्च भागविण्यात यावा.

जेवण, नाष्टा इ. चा खर्च वसतीगृहात वास्तव्य करणाऱ्या मुलींना स्वत: भागवावा लागेल.

प्रत्येक वसतीगृहामध्ये वसतीगृहातील कर्मचारी वर्ग आणि रहाणाऱ्या मुली यांच्या उपस्थितीची नोंद घेण्यासाठी बायोमॅट्रीक प्रणाली तसेच सुरक्षिततेच्यादृष्टीने सुरक्षारक्षक, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा इ. बसविण्यात यावी. यासाठी येणाऱ्या खर्चाचा समावेश वसतीगृहाच्या बांधकामासाठी येणाऱ्या खर्चात अंर्तभूत करण्यात यावा .

वरील सर्व बाबींचा सविस्तर अहवाल प्रत्येक सहा महिन्यांनी जिल्हाधिकारी / प्राचार्य यांनी अल्पसंख्याक विकास विभागास सादर करावा .

विद्युत, पाणी व कार्यालयीन खर्च यासाठी प्रती वसतीगृह वार्षिक अंदाजे रू.६.०० लाख खर्च अपेक्षित आहे. तसेच प्रस्तावित कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी वरीलप्रमाणे रू.९.३० लाख खर्च अपेक्षित आहे. याप्रमाणे प्रती वसतीगृह अंदाजे वार्षिक रू.१५.३० लाख इतके व वसतीगृहांच्या देखभालीकरिता प्रति वसतीगृह रु. २.०० इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देत आहे.

सदर अनुदान वसतीगृह चालविणाऱ्या शासकीय शिक्षण संस्थेच्या प्राचार्याना/जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्थ ठेवण्यात येईल.

३. यावर होणारा खर्च मागणी क्रमांक झेडई -१, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २००- इतर कार्यकम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०८) शहरामधील अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतीगृहाकरिता सहायक अनुदान , (२२३५ ए १४२) ३१- सहायक अनुदान या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४१५ /१४७५ दिनांक २२/०५/२०१३ व वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५१४/१३/व्यय-४, दिनांक : ०१.०६.२०१३ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६१३१३०९१५९५१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samir Ramesh Salunkhe

Digitally signed by Samir Ramesh Salunkhe
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Samir Ramesh Salunkhe
Date: 2013.06.21 18:18:52 +05'30'

(समीर साळुंखे)

अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई

२. महालेखापाल, महाराष्ट्र-१(लेखा परिक्षा), मुंबई

३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
८. संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई
९. जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी (सर्व)
१०. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
११. वित्त विभाग,(अर्थसंकल्प-१४), (व्यय-४) मंत्रालय, मुंबई
१२. नियोजन विभाग, (कार्या.१४७५).
१३. रोख शाखा व कार्यासन- ७, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती, का-.८